# सवत !

मनोहररावांनी आज पक्का निश्चय केला. ऑफिसला दिलेला स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज मुदतीपूर्वीच वापस घ्यायचा. तीन महिन्यांपूर्वी दिलेला. कुणी काहीही म्हणोत. चेष्टा करोत.

कारणंच तशी होती.

मनोहररावांनी आपला निर्णय परत एकवार तपासून पाहण्यास सुरुवात केली. आतापर्यंत कितव्यांदा ? कुणास ठाऊक......

तीन महिन्यांपूर्वी मनोहररावांनी ऑफिसला नियमाप्रमाणे स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज दिला होता. त्यांच्या मनानं घेतलं होतं – 'फार झालं आता...' खूप कुचंबणा करून घेतलीय आपण. फुकट चाललंय आयुष्य –'

तीन महिन्यांपूर्वी असं उत्कटपणे वाटायला कारणंच तशी होती.

घरच्या अतिशय गरीबीच्या परिस्थितीत त्यांना अत्यंत लहान वयात नोकरीला लागावं लागलं होतं. जेमतेम मॅट्रिक झाल्याबरोबर. एकुलता एक मुलगा. घरी म्हातारे आईवडिल. मोठा भाऊ चीनच्या युद्धात कामास आलेला. एकदम घरच बसलं होतं – त्याचं, त्यावेळी.

मनोहररावांना दुसरा मार्गच उरला नव्हता. अत्यंत सुस्वर गळा असलेला मनोहर आपली गायनाची, मोठा प्रख्यात गायक होण्याची महत्त्वाकांक्षा हृदयावर दगड ठेवून सोडून देत कारकुनीच्या क्षेत्रात पदार्पण करता झाला. अडकला. गुरफटत गेला. आवश्यक म्हणून खात्याच्या परीक्षा देत वरवर चढू लागला. वरवर चढत गेला तसतसा अधिकच व्यस्त होत गेला. एका मोठ्या चक्रात गरगरू लागला. त्या महाकाय चक्राचा एक भाग बनून !

त्याच्या पेटीवर धुळीचे थर साचू लागले. तानपूऱ्याच्या तारा गंजू लागल्या. त्याची कला अंधाऱ्या कोपऱ्यात मूक अश्रू गाळत राहिली.

कधीकधी त्यांना उबळ यायची. तानपुरा गवसणीतून बाहेर यायचा. पेटीवरची धूळ साफ व्हायची. गायन शाळेत किंवा एखाद्या मोठ्या गुरुचा गंडा बांधायचा निश्चय व्हायचा. काही दिवस ही केविलवाणी धडपड चालू राहायची. आदर्श डोळ्यासमोर उभे राहायचे. गुलाम अली खाँ, पंडित भीमसेन, कुमार गंधर्व खुणवायचे – त्यांची कला आर्त साद घालायची –

एकदा तर भावनेचा भरात तिच्या आर्त हाकेला साद देण्यासाठी त्यांनी नोकरीचा राजीनामासुद्धा देऊन टाकला. पण घरी आल्याबरोबर समोर उभी

असलेली सुस्वभावी पत्नी अन् तीन लोभसवाणी मुलं दिसल्यावर त्यांना आपला निश्चय अमलात आणणं कठीण वाटू लागलं. त्यांनी राजीनामा परत घेतला. दुसऱ्याच दिवशी

तानपुरा गवसणीत गेला. सूर खोलवर गाडून टाकले त्यांनी.

पण महत्त्वाकांक्षेचा हा ज्वालामुखी पूर्ण निद्रित झाला आहे अशी त्यांची पूर्ण खात्री झाली असताना त्याचा अचानक उद्रेक झाला. अनपेक्षित. वयाच्या पन्नासाव्या वर्षी.

निमित्त झालं त्यांच्या बालमित्राच्या आगमनाचं ! कुमार सेनचं आगमन. स्वरसम्राट कुमार सेन. अखिल भारतीय किर्तीचे गायक कुमार सेन ! त्यांचा बालमित्र.

त्यांना आठवलं. ह्याच कुमारजवळ आपण बालपणी आपली महत्त्वाकांक्षा बोलून दाखवली होती. अनेकवेळा अन् प्रत्येकवेळी हाच कुमार म्हणायचा –

"मनोहर ! तुझ्या गळ्यात गंधार आहे. तू मोठा गायक होणार बाबा. आम्ही काय तुझ्यासमोर – सूर्यासमोर काजवे."

मनोहररावांनी पाहिलं. हा, स्वतःला काजवा म्हणवणारा कुमार केवढ्या महान पदाला पोहचला होता. आपल्या परिश्रमांनी, कठोर अखंड परिश्रम !

त्यानं विवाहसुद्धा केला नव्हता. कलेशी त्यानं लग्न लावलं होतं.

मनोहरराव त्याच्याशी झालेल्या भेटीत शरमिंदे होऊन गेले होते, लाजले होते. त्यानं एखादी चीज ऐकवण्याचा आग्रह केल्यावर.

अन् त्यावर तो बालमित्र गळ्यात हात टाकत म्हणाला होता, "मनोहर! तू मनावर घेशील तर अजूनही वेळ गेलेली नाही. तू रियाझ सुरू कर. बघ, हा हा म्हणता तू सुद्धा मोठा गायक होशील. गळ्यात गंधार आहे तुझ्या. दैव तुझ्या बाजूनंच आहे. बस. हवी थोडी थोडी मेहनत. अजून वेळ गेलेली नाही."

बस ! ह्याच त्याच्या बोलांनी मनोहररावांच्या मनात घर केलं. त्यांनी ठाम निश्चय केला. स्वतःला कलेच्या साधनेत झोकून द्यायचं. स्वरांच्या आराधनेत डुंबून जायचं. वेळ मुळीच घालवायचा नाही. आधीच फार उशीर झालाय. बस्स झाली ही नोकरी ! पुरे झाला संसार !

ज्वालामुखी परत जागृत झाला होता.

त्यांनी निवृत्तीचा अर्ज तर दिलाच. पण लगेच त्याच दिवशी निवृत्तीपूर्वीची रजाही काढली. तीन महिने – आता ऑफिसचं तोंड पाहणंही त्यांना अशक्य

वाटू लागलं होतं. ते घरी आले तेच ओझं झुगारलेल्या खुषीनं. लगेच पेटी घेऊन त्यांनी ती लावायला सुरुवात केली. एका अनिर्वचनीय आनंदानं त्यांचं मन भरून आलं होतं.

'हरी ॐ ! हरी ॐ ! कंठातून स्वर पुष्पांजली अर्पण होऊ लागली त्यांच्या. मिटल्या नयनांतून आसवं वाहू लागली.

मनोहररावांना आजही तो दिवस आठवला, अन् त्यांनी विषण्णपणे मान हालवली. किती तकलादू असतात माणसांचे मनोरथ !

गेल्या तीन महिन्यांच्या अवधीत त्यांना अनपेक्षित, अकल्पित असे अनुभव आलेले होते. सगळ्यात मोठ्या मुलानं तर त्यांना विक्षिप्तच ठरवलं होतं. एक त्यांची पत्नी सोडली तर कुणालाच त्यांचं वागणं, कृती पटली नव्हती. साऱ्यांच्याच वागण्यात फरक पडला होता. त्यांच्याकडे बघण्याचा सर्वांचा दृष्टीकोन बदलला आहे असं त्यांना भासू लागलं होतं. शेंडेफळ चि. ओंकारनं तर चक्क त्यांना विरोध केला होता. कारण त्याचं शिक्षण पूर्ण व्हायचं होतं. त्याला डॉक्टर व्हायचं होतं. मनोहररावांनी पूर्ण नोकरी केली असती तरच हे शक्य होतं. त्याच्या मते मनोहररावांनी असं प्रापंचिक कर्तव्यापासून पळून जाणं स्वार्थीपणाचं होतं. तो चक्क वडिलांचा राग करू लागला होता.

मोठ्यानं ओंकारची समजूत घातली होती. त्याची जबाबदारी त्यानं आपल्या शिरावर घेतली होती. थोरल्या सुनेला हे आवडलं नव्हतं. आपल्या नवऱ्याचं हे बंधुप्रेम तिला पटलं नव्हतं. त्यांनाही स्वतःची मुलं होती. ओंकारचं महागडं शिक्षण पूर्ण करताना त्यांच्या स्वतःच्या मुलांकडे त्यांच्या शिक्षणाकडे कसं लक्ष देता येणार होतं ? अशी काय मोठ्या पगाराची नोकरी होती ? तिच्या प्रश्नावर थोरल्यानं एकच उत्तर दिलं होतं –

"आता मोठ्यांनी ताळ सोडला. जबाबदारी शिरावरून उतरली. मग काय करणार ? आपल्यालाच बघायला हवं सारं. ओंकारला आपलाच मुलगा मान अन् सोस सारं. आमच्या पिताश्रींना आता मोठे गायक व्हायचंय ना ? मग सोसलंच पाहिजे." थोरल्याच्या बोलण्यात अतिशय तिरस्कार भरला होता.

सुनबाईनं डोळे पुसले. पण आजवरचं तिचं त्यांच्याशी असलेलं आदरयुक्त वागणं एकदम बदललं. एखाद्या आश्रिताला वागवावं तसं ती वागू लागली. त्यांच्या पत्नीला इकडे आड तिकडे विहीर असं झालं. ती बिचारी मनोहररावांच्या भावना जपण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागली. त्या पायी होणारी स्वतःची ओढाताण साहत. मनोहररावांचं स्वप्न तिला माहीत होतं. अन् ह्याच मुलांसाठी

त्यांनी आजवर ते कसं दडपून टाकलं हेही तिला ठाऊक होतं. ते कसे गुदमरत होतं ते तिनं अनुभवलं होतं.

आणि एक दिवस मधली मुलगी भैरवी माहेरी आल्यावर तिनं आपलं हृदय मुलीजवळ उघडं केलं. तेव्हा भैरवीही वडिलांची बाजू पूर्णपणे पटवून घेऊ शकली नाही. मनोहररावांप्रमाणे त्यांच्या पत्नीलाही आता खऱ्या अर्थानं अनाथ झाल्यासारखं वाटलं.

मनोहररावांचा पहाटेचा रियाझ ओंकारच्या अभ्यासात व्यत्यय आणू लागला. त्यांच्या गायनशाळेतल्या मित्रांसाठी चहाचा कप देखील मागवण्यात त्यांच्या पत्नीला ओशाळं वाटू लागलं. त्यांचे साथीदार घराच्या दृष्टीने 'टोळभैरव' ठरले. मनोहरराव घरात उपरे ठरले.

भारभूत ?

अजून आपण निवृत्त झालो नाही तरी हे असं जीणं आपल्या वाट्याला यावं ? निवृत्तीनंतर माणसाचं घरातलं प्रमुखाचं स्थान खरंच असं ढळत असावं का ?

मनोहररावांना हाच एक विचार सारखा सतावू लागला होता. गेले तीन महिने. त्यांनी ह्या अवधीत इतर पेन्शनरांच्या जीवनाचं बारकाईनं निरीक्षण सुरू केलं. त्यांना ती सवयच जडून गेली आणि त्यांच्या निष्कर्षाला लवकरच बळकटी आली. आपण समजतो तसं निवृत्तीनंतरचं जीवन शांत, सरळ आणि संथ वाहत नसतं. तुंबल्यासारखं होतं.....

अजून एक गोष्ट त्यांच्या लक्षात अचानक आली. गेल्या तीन महिन्यात त्यांच्या मनानं आपल्या संगीत साधनेच्या विचारांना प्रयत्नांची काहीच खास जोड मिळाली नव्हती. वेल पालवायची तर दूरच पण तिला ह्याच विवर्ताची कीड पोखरू लागली होती.

अन् म्हणूनच मनोहररावांनी आज पक्का निश्चय केला होता. आठ वर्षांनंतर येणारा हा निश्चित अनुभव आपण आजच का ओढवून घ्यावा ? असंच जर चालणार असेल तर कसली संगीत साधना होणार ? त्यांना पटलं. सवत रूष्ट झाली होती. कायमची. पुन्हा तिला प्रसन्न करणं अशक्य होतं आता.

अतिशय दु:खित मनानं मनोहररावांनी ऑफिसमध्ये जाण्याची तयारी केली. लंचचा टिफीन स्कूटरचा डिकीत ठेवताना त्यांनी बंगलीच्या दाराकडे पाहिलं –

दारात त्यांची पत्नी हसतमुखानं त्यांना विश् करीत होती. मागे सूनबाई पण
त्यांनी स्कुटरला किक् मारली.

---